महाराष्ट्र शासन

## आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई, यांचे कार्यालय

विषय :- बियर निर्माणीतून घ्यावयाच्या नमुन्याबाबत.

परिपत्रक

क्र.बीआरएल. ११९९/४३३५९/५-ब मुंबई, ३० जून, २०००

या कार्यालयाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे की, राज्यातील बियर निर्माण्यांमध्ये वेगवेगळ्या संख्येने नमुने घेण्यात येतात. सर्व बियर निर्माण्यांमध्ये नमुना घेण्याच्या पध्दतीत एकसुत्रता रहावी म्हणून पुढील सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

बियरचे नमुने घेण्याच्या तरतुदी दि महाराष्ट्र-मॅन्युफॅक्चर ऑफ बियर अँड वाईन रुल्स, १९६६ च्या नियम ९(१) तसचे बीआरएल. अनुज्ञप्तीच्या अट क्र. ६ मध्ये आहेत. यापैकी नियम ९ (१) मधील तरतुदी घटकास बिआरचा दर्जा व मद्याकांचे प्रमाण तपासण्यास उपयोग व्हावा म्हणून तर अनुज्ञप्तीची अट क्र. ६ मध्ये बीआरची तीव्रता तपासण्याकरिता करण्यात आल्या आहेत. निम ९ (१) मध्ये आयुक्त नक्की करतील तेवढया परिमाणाचे नमुने बियर उत्पादक घेऊ शकतात. नियमावलीतील या तरतुदी विचारात घेऊन बियरचा दर्जा व त्यातील मद्याकाचे प्रमाण तपासण्यासाठी बियर बाटल्यांमध्ये भरण्यापुर्वी घटक ६५० मि.ली. च्या १२ वाटल्या किंवा ३३० मिलीच्या २४ बाटल्या उत्पादन शुल्क न भरता नमुना घेता येऊ शकतील. घटकास त्यापेक्षा अधिक परिमाणाचे नमुने घ्यावयाचे असल्यास त्यावर विहीत दराने उत्पादन शुल्क भरल्यास अधिक नमुने घेण्यास परवानगी देण्यात यावी.

बीआरएल अनुज्ञप्तीची अट क्र. ६ अन्वये फक्त दोन बाटल्यात नमुने घेण्याच्या तरतुदी आहेत. सदर नमुने त्यातील मद्यार्काची तीव्रता शासनाच्या विहित प्राधिकरणाकडून तपासण्यासाठी आहे. सदर सूचना स्वयंस्पष्ट असल्याने त्याबाबत अधिक खुलाश्याची आवश्यकता नाही.

या सूचना हे परिपत्रक बियर निर्माणीत प्राप्त झाल्यापासून अंमलात येतील. परिपत्रक प्राप्त होण्यापूर्वी परिपत्रकात नमूद केलेल्या संख्येपेक्षा अधिक नमुने घेतले असल्यास त्यावर उत्पादन शुल्क वसुल करण्यात येऊ नये.

स्वाक्षरीत/-
(आनंद भी. कुलकर्णी)
आयुक्त,